नियमीत दिवाणी दावा क्रमांक 156/2019
राबियाबी वि. रज्ज़ाक +3
MHLA130008442019

**निशाणी क्र.20 वरील आदेश.**

**(दि.05.12.2023)**

**1.** वादीने प्रस्तुत चा अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहिता चे क्रम. 6 नियम 17 प्रमाणे दाखल करून दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवाणगी मागितली आहे.

2. वादीचे असे म्हणणे आहे की नोंदणीकृत बक्षीसपत्रा आधारे वादमिळकतीचा तो 1983 साली मालक झाला. दाव्यामध्ये नजर चुकीने आणि टंकलेखकाच्या चुकीमुळे 1983 ऐवजी 1985 असे लिहिण्यात आलेले आहे.

**3.** वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, त्याने त्याने वादपत्रा मध्ये प्रतिवादींनी बनावट कागदपत्रांच्या आधारे तलाठ्याशी हात मिळवणी करून फेरफार मंजूर करून घेतला आणि त्या आधारे वाद मिळकतीवर हक्क सांगत आहेत असे नमूद केलेले आहे. परंतु वादपत्रामध्ये सदर फेरफाराचे क्रमांक नजरचुकीने आणि टंकलेखनाच्या चुकीमुळे नमूद केले गेले नाहीत. त्यामुळे फेरफार क्रमांक 282 आणि फेरफार क्रमांक 456 दाव्या मध्ये नमूद करणे आणि अनुषंगिक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याबाबत परवानगी द्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**4.** प्रतिवादीने निशाणी क्रमांक 24 वर त्याचे म्हणणे दिले आणि अर्जाला आक्षेप घेतला आहे. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की प्रस्तुतचा अर्ज मुदतित नाही. वादीने जाणून बुजून अर्ज उशिराने दाखल केलेला आहे. अर्ज दाखल करण्यासाठी निश्चित आणि कायदेशीर असे कारण वादीने दर्शवलेले नाही. त्याचबरोबर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार आहे. प्रतिवादी चे पुढे असे म्हणणे आहे कि, वादीने सदर फेरफारा विरुद्ध संबंधित विभागा कडे अपील करण्या ऐवजी या दाव्यात त्याला आक्षेप घेतला आहे. असे करण्याचा वादीला काहीही अधिकार नाही. म्हणून वादीचा अर्ज खर्चासह नामजूर करावा.

**5.** अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ श्री. जे. के. पठाण व प्रतिवादी चे विद्वान विधीज्ञ श्री. डी. एस. कातळे यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जातील कथन तसेच प्रतिवादीने दिलेले म्हणणे आणि युक्तिवादा दरम्यान मांडलेल्या बाबी, या सर्वांचा एकत्रित विचार केला असता जे मुद्दे उपस्थित झाले, ते मुद्दे आणि त्या मुद्दया वरील निष्कर्ष आणि त्या निष्कर्षा प्रत येण्यासाठीची कारण मीमांसा पुढील प्रमाणे नोंदविली आहे.

## विचाराधीन मुदे

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| (1) | वादीने प्रस्तावित केलेली दुरुस्ती दाव्यात करण्याची परवानगी वादिस देणे योग्य व न्याय्य होईल काय? | .. होय. |
| (2) | अंतिम आदेश काय? | .. अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.1 साठी.**

6. वादीने प्रस्तुतचा दावा त्याला वाद मिळकतीचा मालक घोषित करावे आणि त्याचबरोबर प्रतिवादीने त्याच्या मालकी हक्कावर कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप किंवा अडथळा करू नये अशा प्रकारचे कायमचे मनाई हुकुमाचे आदेश त्याच्या हक्कात पारित करावेत यासाठी दाखल केलेला आहे.

**7.** वादी दाव्या मध्ये असे म्हणून न्यायालयात आलेला आहे की, तो वाद मिळकतीचा मालक आहे. सदर वाद मिळकत त्याला नोंदणीकृत बक्षीसपत्र डे बुक क्र.472/1983 दिनांक 15.02.1983 आधारे मिळालेली आहे.

**8.** वादपत्राचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की वादी ने त्याच्या वाद पात्रामध्ये बक्षीस पत्र द्वारे त्याला जमीन मिळाली असे नमूद केलेले आहे.

त्याचबरोबर प्रतिवादीने महसूल अधिकाऱ्यांशी संगणमत करून, हात मिळवणी करून स्वतःचे नाव बनावट फेरफारा आधारे वाद मिळकतीच्या हक्क अभिलेखावर नोंदवून घेतले आहे असे सुद्धा त्याने दाव्यात नमूद केलेले आहे. दाव्यामध्ये जरी फेरफाराचा क्रमांक नमूद केलेला नसला तरी त्या संदर्भाने उल्लेख (pleading) वादीने त्याच्या दाव्यामध्ये केलेली असल्यामुळे सदर फेरफाराचा क्रमांक दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. दाव्यासोबत वादीने कागद पत्र दाखल केले आहेत, त्यामध्ये सदर दस्त सुद्धा आहेत. सदर दस्ता चे अवलोकन केले असता वादीने दाखल केलेल्या अर्जा मधील कथन यांना पुष्टी देणारे ते दस्त आहेत हे स्पष्ट होते.

9. प्रस्तावित दुरुस्ती केल्यामुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. उलट पक्षी सदर बाबींचा दाव्यामध्ये समावेश केल्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या मधील वादावर अंतिम निर्णय देण्या साठी सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज देण्यासाठी विलंब झाला आहे, या एवढ्या कारणास्तव जर अर्ज नामंजूर झाला तर वादीला प्रकरणा संदर्भाने महत्त्वाच्या बाबी पटलावर आणता येणार नाहीत, आणि त्यामुळे वादीचे नुकसान होईल. म्हणून प्रस्तावित बदल मंजूर करणे आवश्यक आहे असे निष्कर्ष निघतात. सदर अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होणार नाही ही बाब निश्चितच आहे. त्याचबरोबर अर्ज नामंजूर केल्यास दाव्याचा निकाल गुणदोषावर लावता येणार नाही. दाव्यामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करण्याची संधि नाही दिली तर उभय पक्षकारांचे हक्क व अधिकार यांबाबत अंतिम निर्णय देता येणार नाही. अर्ज दाखल करण्यास निश्चितच उशीर झालेला आहे. तथापि, या प्रकरणामधील एकंदरीत परिस्थितीचा विचार करता, केवळ उशीर झालेला आहे म्हणून वाडीचा अर्ज नामंजूर करणे योग्य व न्याया होणार नाही. परिणामी वादीने दाखल केलेला अर्ज मंजूर करणे आवश्यक असल्यामुळे मुद्दा क्र. 1 चे उत्तर होकरार्थी नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र. 2 साठी</u>**

**10.** प्रस्तुतचा दावा वादीने सन 2019 साली दाखल केलेला आहे आणि प्रस्तुचा अर्ज वादीने दिनांक 19-08-2023 रोजी दाखल केलेला आहे. अर्ज दाखल कण्यासाठी झालेला उशीर आणि त्यामुळे दाव्याच्या गतील बसलेली खिळ आणि प्रतिवादींचा अर्जास आक्षेप आणि प्रस्तावित दुरुस्तीचे दाव्यामधील महत्व या सर्व बाबींचा समतोल साधण्याच्या दृष्टीकोणातून, तसेच मुद्दा क्र. 1 च्या निष्कर्षा प्रत येण्यासाठी नोंदविलेल्या कारण मीमांसा या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून मुद्दा क्र. 2 च्या उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

## आदेश

(1) वादीचा अर्ज वादीवर रुपये 400/- खर्च बसून मंजूर करण्यात येत आहे.

(2) वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादीला यांना पुढील नेमलेल्या तारखे पर्यन्त द्यावी.

(3) खर्चाची रक्कम दिल्यानंतर वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करून घ्यावी आणि त्याचबरोबर नव्याने समाविष्ट केलेल्या प्रतिवादींना दाव्याचे समन्स पाठविण्यासाठी योग्य ती तजवीज करावी.

(4) वादीने दुरुस्त दाव्याची प्रत पटलावर दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात घोषित.)

स्वाक्षरीत

दिनांक. 05.12.2023

(रमाकांत बी. हनवते)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर. रेणापुर